# फौजदारी दंड प्रक्रिया संहिता अन्वये प्रतिबंधक उपाय योजना

**चॅप्टर केसचा प्रस्ताव, नोटिस व अंतरिम बंधपत्र (नमुना)**
**प्रतिबंधक कारवाई**
(काल्पनिक उदाहरणावर आधरित)

(फौ. प्र सं.कोड कलम ११० (ई) (ग) चा नमुना)

चॅप्टर केस क्र.........../ २००४
फौजदारी दंड प्रक्रिया सहिता

प्रति,
मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, कलम ११०
अन्वये कारवाई होणेबाबत प्रस्ताव सांताकुझ
विभाग, मुबई

**विषय :** - फौ.प्र.स. कलम ११० (ई) (ग.)

विरोधकाची नावे
१ ( ................ नांव ........) मु ३२
फौजदारी दंड पक्रिया संहिता
क्लम ११० अन्वये कारवाई होणेबाबत प्रस्ताव

अन्वये कार्यवाही होणे याबाबत

महोदय,

आपणास अहवाल सादर करण्यात येतो की, यातील साक्षीदार हे आपल्या कुटूंबासह बाजुस नमुद पत्यावर राहण्यास आहेत.तसेच विरोधक हे त्याच्याच परिसरात त्याच्या शेजारी राहण्यास आहेत त्यामुळे एकमेकास चांगल्या प्रकारे ओळखतात.

विरोधकाविरुद्ध यापूर्वी समासात नमूद प्रमाणे निर्मल नगर व सांताकुझ पोलीस ठाणे येथे नोंद आहे सदर गुन्ह्यात त्याना अटक करण्यात आली होती. तसेच सन २००२ मध्ये विरोधकाविरुद्ध एम. पी. डी.ए. कायद्यान्यये कारवाई केलेली असून त्यावेळेस त्यास नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबद्ध केलेले होते.

**साक्षीदार** - नजदीकच्या काळात विरोधकाविरुद्ध

१) (... नाव........), वय खालीलप्रमाणे अदखलपात्र गुन्हा नोंद झालेला आहे

२) (..... .नाव.....), वय - अदगुर क्र ११७/ ०४ कलम ३५१, ५०४ भा. द.वि.

३) (.... .नाव.........) वय यातील साक्षीदार न. १ (....... .नाव.......)
४) (.... .नाव........) वय - व विरोधक हे एकमेकाना ओळखतात विरोधक हे
नेहमी साक्षीदार न. १ याना पाहून हसत असतात.

मु ठि लॉन्डी गझी, गझधर बांध दिनाक २५/ १/ २००४ रोजी २२. ०० वाजता
नीळकठेश्वर मदिर, हिरामोती इमारतीच्या साक्षीदार नं १ ह्या व्यवहाराच्या सबंधी
विरोधकाची
बाजूला, साताकुझ (प) मुबई - ५४ वहिनी (...... .नाव..........) हिच्या सोबत बोलत
असताना विरोधकाने मध्यस्थी करून साक्षीदार न १ व
त्याच्या
पतीस शिवीगाळ केली व अंगावर धावून गेला म्हणून
विरोधका विरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे

विरोधकाविरुद्ध दाखल गुन्हे : - तसेच साक्षीदार नं २ (.... .नाव....) वय
१) गु र क्र ३०९ ०० क ३२६, ५०६ वर्षे, धंदा - किराणा दुकान, यानी सुद्धा विरोधकाने
१४ भा. द वि निर्मल नगर पो. ठाणे केलेल्या अन्यायाबाबत दिनाक ४/ २/ २००४ रोजी तक्रार
अर्ज केलेला आहे.

२) गु रजि क्र. १३२! ०० क. ३२६, साक्षीदार नं ३ ( नाव..) व वय
५.०६ ( २). वर्षे, धदा एजंट यानी सुद्धा त्याच्यावर झालेल्या
अन्यायाबाबत निर्मल नगर पो. ठाण्यास दिनांक ४/ २/
२००४ रोजी अर्ज केलेला आहे.

३) २) गु. रजि. क्र ४३९/०१ क३२६,विरोधक हे गुंड प्रवृत्तीचे असून, त्यानी त्यांच्या पूर्वीच्या
५०६ ( २) १४ भा द. वि. कारवाया चालू केलेल्या आहेत त्यामुळे साक्षीदार यानी
(साताकुझ पो ठाणे) त्याच्या विरुद्ध तक्रार अर्ज केलेले आहेत विरोधक हे गुंड व
धाडसी प्रवृतीचे असल्याने

४) गु. रजि. क्र. ४९१/ ०१, क. ३५४ सदर परिसरातील लोक त्याच्या दहशतीला फार घाबरून
गेलेले आहेत.

अदखलपात्र गु र. क्र. ११७/ ४ विरोधक यांनी यापूर्वी केलेल्या गुंन्हाचे तसेच साक्षीदार
२५/ ०१/ २००४ यानी केलेल्या तक्रार अर्जाचे बारकाईने अवलोकन केले
साक्षीदार क्र. १ ते ४ यानी केलेली तक्रार असता, नमूद विरोधक भयकर साहसी व धाडसी प्रवृत्तीचे
अर्ज कलम १११ फौ. प्र. सहिता असल्याचे दिसून येते तसेच नजीकच्या काळात त्यांना
अन्वये कारणे दाखवा नोटिस काढण्यात येकुन एखादा गंभीर वरूपाचा गुन्हा घडण्याची शक्यता
आली आहे नाकारता येत नाही तसेच विरोधक हे कुटुंबप्रमुख असून
कुटुंबाचा आधारस्तंभ आहे तो सतत अशा दहशतीच्या
प्रकारच्या गुन्हयांत गुतंत गेल्यास त्याचा भविष्यकाळ

अंधारमय होईल, आणि त्यामुळे त्याला व त्याच्या
कुटूबिंयाना समाजात सन्मानाने राहणे शक्य होणार नाही.
त्याचा भविष्य काळ हा उज्जवल व्हावा म्हणून त्याच्या

गैरकुत्यास, प्रवृत्तीस वेळीच आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे. विरोधकास योग्य त्या कारणाशिवाय मोकळे सोडल्यास तो तेथील रहिवाशाचे जीवितास व मालमत्तेस धोका पोहोचविण्याची दाट शक्यता आहे. विरोधकास गुन्हेगारी प्रवृत्तीपासून परावृत्त करण्यासाठी त्याच्याविरुद्ध कलम ११० (इ) (ग) फौजदारी दंड विधान प्र. सं. अन्यथे कारवाई होऊन त्याच्याकडून (..... रकमेचा.. . मुदतीचा) दोन जामीनदारासह चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र लिहून घेण्यात यावे, जेणेकरून त्याच्यावर बंधन राहील.

तसेच विरोधकास सदर कार्यप्रक्रिया कालावधीत अशा प्रकारे गुन्हे करण्याची शक्यता असल्याने त्याच्यावर कलम ११६(३) फौ. प्र. सं. प्रमाणे कार्यप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चांगली वर्तणूक, स्वथ्यपणा वर नमूद रकमेच्या दोन जामीनदारासह अंतरिम बंधपत्र लिहून घेण्याविषयी फर्माविण्यात यावे ही विनती,

मा. सविनय सादर

वरिष्ठ पोलीस नि. सांताकुझ पो. ठाणे मुंबई

# फौजदारी दंड प्रक्रिया संहिता अन्वये प्रतिबंधक उपाय योजना

(काल्पनिक उदाहरणावर आधरित)

(फौ. प्र सं.कोड कलम १०७ चा नमुना)

प्रति,

मा. कार्यकारी दंडाधिकारी, तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
अंबड विभाग, नाशिक

.........................................................................................................

**चॉप्टर केस क्र २/२०१९ सि आर पी सी १०७ प्रमाणे**

.........................................................................................................

जाब घेणार :- एस टी. पाटील, पोलीस उप निरीक्षक अंबड पो.स्टे., नाशिक शहर

सामनेवाला :- अब्दुल हमीद पठाण, वय ४५ वर्ष, धंदा भंगार व्यापारी रा. अंबड लिंक रोड, नाशिक
(यास सि.आर.पी.सी. ४१(१) अन्वये नोटीस देउन आपले न्यायालयात हजर राहण्याची समज देण्यात आली आहे. )

महोदय,

आदरपुर्वक सादर आहे की, यातील सामनेवाल हा अंबड लिंक रोड या ठिकाणी भंगाराचा व्यापार करतो. साक्षीदार हा त्याचा नेहमीचा भंगार वेचुन त्याला विकणार ग्राहक आहे. दिनांक ०७/०१/२०१९ रोजी यातील सामनेवाल हा त्याचे दुकानावर असतांना यातील साक्षीदार हा दुपारी १४/३० वा. चे दरम्यान भंगार विकणेसाठी आला त्याने त्याला भंगार विकले परंतु भंगारचे पैसे ठरल्या प्रमाणे दिले नाही. यावरुन त्या दोघांमध्ये मोठा वाद झाला. तेव्हा यातील सामनेवाला याने तु अगर दोबारा मेरे दुकान पे आया तो मै तेरे को काट डालुंगा असे बोलुन शिवीगाळ केली. यानंतर साक्षीदार हा अंबड पोलीस ठाणे येथे आला व सामनेवाला याचे विरुध्द अदखलपत्र गुन्हा क्र. १६/२०१९ कलम ५०६, ५०४, भा.द.वि. अन्वये दुपारी १६/०० वा. अंबड पोलीस स्टेशन येथे दाखल आहे.

यातील साक्षीदार नेहमी भंगार वेचुन सामनेवाला च्या परिसरा मध्येच भंगार विक्री करत आहे. यातील सामनेवाला हा जुन्या भांडणाचा राग मनात धरुन यातील साक्षीदार यांना मारहाणा करुन मोठा दखलापत्र गुन्हा केल्या शिवाय राहणार नाही. अशी शक्यता असुन सामनेवाला व साक्षीदार हे हिंन्दु व मुस्लीम धर्मीय आहे. जर भविष्यात गुन्हा घडला तर मोठा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणुन वेळीच प्रतिबंध व्हावा म्हणुन सामनेवाला याचे कडुन सि. आर.पी.सी. १०७ अन्वये जातमुचलका घ्यावा. व त्याा अंतिरीम बॉन्ड ११६(३) प्रमाणे सोडवायचे

असल्यास अंबड लिंक प्रभागातील एक हिंन्दु व एक मुस्लीम अशा दोन प्रतिष्ठीत नागरिकांचा जामीन मुचलका घेवुन त्याचा दिर्घ मुदतीचा बॉन्ड घेणेस विनंती आहे.

साक्षीदार :- १) नरहरी झांबरू पटरे रा. अशोकनगर सातपुर कॉलनी, नाशिक
२) पोहवा/१०० एस के पाटील

मा. सविनय सादर

**एस टी. पाटील,**
पोलीस उप निरीक्षक
अंबड पो.स्टे., नाशिक शहर

मार्फत :.
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
अंबड पो.स्टे, नाशिक शहर

## प्रतिबंधक कारवाई

**(फौ. प्र. सं. कलम १११ प्रमाणे नोटिसचा नमुना)**
**विशेष कार्यकारी दंडाधिकारी सांताकुझ विभाग, सांताकुझ पोलीस**
**ठाणे इमारत, पहिला माळा, सांताकुझ (प) मुंबई - ५४ यांचे न्यायालय**
**(विरोधकांविरुद्ध १११ फौप्र .सं. कलम १११ अन्वये कारणे दाखवा नोटिस)**

न्यायालय सुरक्षा कार्यवाही
प्रकरण क्र. / २००४
कलम ११० फौ. प्र. स.

प्रति
१) (......... .नाव.............) मु. ३२

शिवीगाळ केलीत व अंगावर धावून गेलात म्हणून आपल्या विरुद्ध वरीलप्रमाणे गुंन्हा नोंद करण्यात आला रा. मु ठि लन्ही गडी, गझधर बांध., नीळकंठेश्वर मदिर, हिरामोती इमारतीच्या बाजूला, सांताकुझ (प )मुबई ५४. ज्याअर्थी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सांताकुझ पोलीस ठाणे, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावातील नमूद माहिती या न्यायालयास सादर केली आहे. सदर अहवालाप्रमाणे तुम्हास असे कळविण्यात येते की, आपण या न्यायालयाचे अधिकारक्षेत्रात राहत अष्ट, गजधर बांध सांताक्रुझ प मुबई येथे राहणारे साक्षीदार १) (......... .नाव............), वय - २) (......... .नाव..... ......), वय ३) (......... .नाव........), वय व ४) (......... .नाव.............), वय - यांना नाहक त्रास देऊन त्याना सतावत असतात. म्हणून साक्षीदार नं. २ ते ४ यानी आपल्या विरुद्ध या पोलीस ठाण्यास तक्रार अर्ज सादर केलेले आहेत. आपण या पोलीस ठाणेच्या अभिलेखावर असून, नजदीकच्या काळात साक्षीदार न. १ यानी आपल्याविरुद्ध खालीलप्रमाणे अदखलपात्र गुन्हा नोंद केलेला आहे

गु. र. क्र. १९७/ २००४, कलम ३५१, ५०४ भा. द. वि.

यातील साक्षीदार (......... .नाव...........), व आपण एकाच विभागात राहता, म्हणून एकमेकाना ओळखतात. आपण नेहमी साक्षीदार याना पाहुन हसत असतात.

दिनाक...... /...... /.......... रोजी २२. ०० वा साक्षीदार ह्या व्यवहाराच्या संबंधी आपली वहिनी (....... नाव....) हिच्या सोबत बोलत असताना आपण मध्यस्थी करून साक्षीदार व त्याचे पतीस

शिवीगाळ केलीत व अंगावर धावुन गेलात म्हणून आपल्या विरध्द वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे .

याबाबत (या स्वरूपाच्या..........................................................................................................................................................................................................................................................................................................)

काही तक्रारी आलेल्या आहेत.

तसेच आपण चाकू सारखे घातक शस्त्र जवळ बाळगता, त्यामुळे यापूर्वी आपल्याविरुद्ध निर्मलनगर व सांताकुझ पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

यापूर्वी आपण केलेल्या दखलपात्र गुन्हात आपणास अटक केल्यामुळे आपल्या विरुद्ध सन २००२ मध्ये एम पी. डी ए अन्वये कारवाई करून आपणास नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबद्ध केले होते.

तरी तुमच्या गुंड प्रवृत्तीस वेळीच आळा बसावा, तुमच्या प्रवृत्तीमुळे समाजास धोका आहे. तसेच तुमच्या गुंड प्रवृत्तीमुळे तुमच्या हातून एखादा गंभीर स्वरूपाचा गुन्हा होऊन सदर परिसरातील शांततेचा भंग होऊ नये, म्हणून तुमच्या गुंड प्रवृत्तीस वेळीच पायबंद करणे आवश्यक आहे, असे या न्यायालयाचे मत झालेले आहे. तरी तुमच्या विरुद्ध कलम ११० (इ) (ग) फौ. प्र स. अन्वये कारवाई का करण्यात येऊ नये तसेच तुमच्याकडून चांगली वर्तणूक ठेवण्याबाबत व सदर परिसरात शांतता राखण्याबाबत रु १०, ०००/ - (दहा हजार फक्त) एवढ्या रक्कमेचे दोन वर्ष मुदतीचे दोन लायक जामीनदारांसह बंधपत्र का लिहुन घेण्यात येऊ नये? याचे कारण दाखविण्यासाठी तुम्ही या नोटिसांद्वारे दिनांक १/१/ २००४ रोजी स. ११०० वा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सांताकुझ (प.) मुबई यांचे न्यायालयात हजर राहण्याकरिता तुम्हास आदेशित करण्यात येत आहे याची नोंद घ्यावी

आज दिनाक....../....../ २००४ रोजी माझ्या सही व शिक्कानिशी

विशेष कार्यकारी दंडाधिकारी

सांताकुझ विभाग, मुबई

**प्रतिबंधक कारवाई**
**कलम ११६(३) फौ. प्रक्रिया संहिता नुसार**
**अंतरिम बंधपत्राचा आदेश (नमुना)**

कोर्ट विद्यमान श्री. विशेष कार्यकारी
दंडाधिकारी/ साहाय्यक पोलीस आयुक्त, विभाग

**जाब देणार -**

यास कलम १११ फौ. प्र. स नुसार कारणे दाखवा नोटिस देण्यात आली त्यावरुन त्याना कारणे दाखविण्याचे सागितले आहे.

**साक्षीदार -**

सांगणेनुसार जाब देणार हे चौकशीच्या काळामध्ये शांतता भंग किंवा गंभीर स्वरूपाच्या गुन्हात भाग घेण्याची शक्यता असल्यामुळे त्याचे वर्तणुकीवर बंधन ठेवणे आवश्यक आहे. अर्जदाराचे रिपोर्टवरून आणि जाब देणारांचे उत्तरावरून तसेच इतर साक्षीदाराच्या घेतलेल्या बयानावरून आमची अशी खात्री झाली आहे की, जाब देणार यांचेवर बंधन न ठेवल्यास ते शांतताभंग करतील, किंवा गंभीर गुन्हयांत भाग घेतील किंवा कोणताही हस्तक्षेपीय अथवा अहस्तक्षेपीय गुंन्हा करतील ज्यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होऊन जीवित हानी होऊ शकते, यामुळे त्याचेकडून चांगले वर्तणूकीसाठी बंधपत्र घेणे आवश्यक आहे.

म्हणून, मी याद्वारे आदेश देतो की, जाब देणार यानी खालील अटींवर सदर प्रकरणाची चौकशी संपेपर्यंत अतरिम बंधपत्र द्यावे

१ ) जाब देणारानी द्यावयाचे वैयक्तिक बंधपत्र रु. ................. चे प्रत्येकाने द्यावे

२ )

माझी सही आणि शिक्यानिशी विशेष कार्यकारी दंडाधिकारी/सपोआ

ठिकाण

दिनाक

## चॅप्टर केसेस संबंधी बंधपत्रासाठी मार्गदर्शक तत्त्वे

जामीन व बंधपत्र याची मूलभूत तत्त्वे सर्वस्वी भिन्न आहेत. सामनेवाला कोर्टात चौकशीचे कामी हजर व्हावा या हेतूने जामीन घेतला जातो. तर सामनेवाल्याने शांतता पाळावी, सद्वर्तनी राहावे व हमीच्या विशिष्ट अटींचे तंतोतत पालन करावे या हेतूने हमी घेतली जाते.

१) जामीन मिळणे हा मूलभूत अधिकार आहे अटक झालेल्या इसमास जामीन मिळवून देणे हे कार्यकारी दंडाधिकारी याचे कर्तव्य आहे मात्र धंदेवाईक जामीनदाराचा जामीन घेऊ नये.

२) जामीनदाराचा व सामनेवाल्याचा व्यक्तिगत परिचय असावयास हवा त्याचा सामनेवाल्यावर प्रभाव असावा. सामनेवाला फरार झाला तर त्यास पकडून आणण्याची क्षमता त्यात असावी. असे करू न शकणारे जमीनदार घेऊ नयेत.

३) जामीन घेताना सामनेवाल्याचे चारिर्य व पूर्वीची वर्तणूक याचा नीट अभ्यास केला पाहिजे पूर्वीचा इतिहास अतिशय महत्त्वाचा आहे पूर्वी फरार झालेल्या इसमाना जामीन देताना अधिक काळजी घ्यावी त्याचप्रमाणे पुर्वी फरार झालेल्या सामनेवाल्याना हजर करू न शकलेल्या जामीनदाराचा जामीन स्वीकारू नये.

४) अपराध किती गंभीर आहे, किती मोठी शिक्षा होण्याची शक्यता आहे, याचा विचार करावा मोठ्या शिक्षेची शक्यता असल्यास आरोपी फरार होण्याची शक्यता वाढते.

५) दूरचे व परके इसम फरार होण्याची शक्यता अधिक असते. त्या मानाने स्थानिक इसम फरार होण्याची शक्यता कमी असते.

६) सामनेवाला व जामीनदार दोघाची ओळख, ठावठिकाणा पक्का समजणे आवश्यक आहे. याकामी मदत करण्यास वकिलांना सागता येते. पक्की ओळख न पटलेले इसम धोकादायक ठरू शकतात.

७) ज्याचा स्थिर व्यवसाय आहे, जमीनजुमला आहे असे इसम सहसा फरार होत नाहीत. याउलट भटके, स्थावर मालमत्ता नसलेले इसम फरार होण्याची शक्यता अधिक असते.

८) कुटुंबवत्सल इसम फरार होण्याची शक्यता कमी असते याउलट सडेफटींग फरार होण्याची शक्यता अधिक असते.

९) भारी रकमेचा जामीन दिलेले इसम फरार होण्याची शक्यता कमी असते यासाठी सामनेवाल्याचे चारित्र्य, इतिहास, गुन्हाची गंभीरता या सर्व बाबींशी सुसंगत अशी जामिनाची रक्कम ठरविली पाहिजे.

**६.आर्थिक कुवत** - जामिनाची रक्कम भरण्याइतपत आर्थिक क्षमता जामीनदाराकडे असावयास हवी. खक्केवाल्याचे वर्तन त्यावर घातलेल्या अटीप्रमाणे होईल याची खात्री मिळविणे, हा हमी घेण्याचा उद्देश आहे विशेष कार्यकारी दंडाधिकारी याना खालील बाबी ठरविण्याचा सपूर्ण अधिकार आहे.

१) बंधपत्राची रक्कम.

२) हमीदारांची संख्या.

३) हमीदाराचा वर्ग व प्रकार.

४) हमीदाराचे चारित्र्य

५) बंधपत्राच्या अटी

विशेष कार्यकारी अधिकारी यानी दिलेल्या आदेशानुसार बंधपत्र देता न आल्यास सामनेवाल्यास तुरुंगात रहावे लागते. विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांना दिलेल्या व्यापक अधिकाराचा वापर त्यानी अतिशय परिणामकारक, प्रतिबंधक कार्यवाहीसाठी करावयास हवा मात्र कार्यवाही कायद्याच्या कक्षेतच असावी, नैसर्गिक न्यायाशी सुसंगत असावी, व त्यात व्यक्तिस्वातत्र्याचे

त्र्याचा पूर्णपणे नाश होईलच अशा टोकाची ती नसावी आवश्यक तेवढा प्रतिबंध, मग तो या मर्यादेत कितीही मोठा असला तरी चालेल .

**बंधपत्राची रक्कम -**

१) बंधपत्राची रक्कम लहान असेल तर सामनेवाल्यास दुष्यकुत्यापासुन परावृत्त करता येणार नाही आपण अटीचे पालन न केल्यास आपले नुकसान होईल, याची जाणीव होऊन अटीचे पालन करण्यास सामनेवाल्यास प्रवृत्त करता येईल इतकी रक्कम मोठी असावी. आर्थिक लाभाचे उद्देशाने गुन्हा होत असेल तर आर्थिक गुन्हेगारीतून होणाया एकदरीत अपेक्षित लाभापेक्षा बंधपत्राची रक्कम मोठी असावी. असे केल्याने गुन्हेगारीचा मुळ उद्देश व प्रेरणाच नष्ट होईल

२) गुन्हेगारीपासून होणारे व्यक्ती वा समाजाचे नुकसान किती असेल, याचा अंदाज घ्यावयास हवा. सरकारला अधिक पैसा मिळावा हा बंधपत्राचा उद्देश नाही. तथापि, व्यक्तीचे व समाजाचे दुष्यकुत्यामुळे होणारे नुकसान भरून निघेल इतकी बंधपत्राची रक्कम हवी गुन्हाचा प्रकार, गुन्हेगाराचे चारित्र्य, सामाजिक परिस्थिती, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष होणारे नुकसान या बाबींचा गांभीर्याने विचार करून रक्कम ठरवावयास हवी. सामनेवाला गरीब असो वा श्रीमंत, तो जेलमध्ये जाईल की नाही यापेक्षा समाजाचे नुकसान भरून निघेल की नाही याला प्राधान्य द्यावयास हवे

३) सामाजिक हितासाठी जर काही व्यक्ती अथवा संस्था हमी भरण्यासाठी पुढे येत असतील तर त्याचेसाठी बंधपत्राची रक्कम नाममात्र असावी किंवा शून्य असली तरी चालेल त्याचेकडून मोठी रक्कम मागितल्यास ते हमी देण्यास प्रवृत्त होगार नाहीत सामनेवाल्यास अशा व्यक्तीचा विश्वास टिकविण्यासाठी भाग पडावे. अशा व्यक्ती व संस्था याना सामनेवाल्याचे नियंत्रण करण्यासाठी शक्ती प्राप्त व्हावी एवढाच हेतू असल्याने शून्य रकमेचा जामीनच अशांचे बाबतीत योग्य ठरेल .

**हमीदारांची सख्या-**

१) अतिरेकी चारि चारित्र्याचे इसमास आटोक्यात ठेवणे एकट्या दुकट्या हमीदारास जमेलच असे नाही एकापेक्षा अधिक लोकांची हमी घ्यावयास लागली तर त्या व्यक्तीचे नियत्रण अधिक चांगले होते हे लक्षात घेऊन हमीदाराची सख्या ठरवावी.

२) वेगवेगळे हमीदार वेगवेगळ्या हेतूने घेता येतात. समाजाचे नुकसान भरून देण्याइतका ऐपत असलेला एक तरी हमीदार असावा. अशी एकच व्यक्ती नसेल तर सर्व मिळून पूर्ण नुकसान भरपाई करू शकतील, इतके हमीदार असावेत.

३) सामनेवाल्याची सुधारणा व त्याचे पुनर्वसन करणा-या इसमाना अथवा व्यक्तींना सामनेवाल्याचे नियत्रण करता यावे, म्हणून काही हमीदार घेणे हितावह आहे.

**हमीदारांचा वर्ग व प्रकार -**

१) सर्वसाधारणपणे हमीदार तीन वर्गात मोडतात. पहिला वर्ग सामनेवाल्याचे समर्थकाचा असतो. समाजाचे हितापेक्षा सामनेवाल्याचे व्यक्तिगत हिताची या वर्गास अधिक चिंता असते सामनेठाल्यास गुन्ह्यास प्रवृत्त करणारे, त्याचे धंद्यातील मालक, भागीदार, सामनेवाल्याचे नातलग व मित्र या वर्गात मोडतात या वर्गातील लोक साहजिकच मोठ्या उत्साहाने हमी भरण्यास पुढे सरसावतात. मात्र गुन्हयांचे नियत्रण करण्याची त्याची इच्छा प्रबळ नसते सामनेवाल्याने हमीचे अटीचा भग केल्याचे त्याचे लक्षात आले तरी त्याचे नियंत्रण करण्याऐवजी ते तिकडे दुर्लक्ष करून सामनेवाल्यास पाठीशी घालतात. अशा वर्गातील हमीदार स्वीकारले तर गुन्हामुळे ज्याचे नुकसान होत आहे अशा व्यक्ती, सस्था अथवा समाजास गुन्हे प्रतिबंधाबाबत फारसा विश्वास वाटत नाही समाजात सुरक्षिततेची भावना उत्पन्न करण्याचा मूळ उद्देश यामुळे सफल होत नाही प्रत्यक्षात गुन्हाचे नियत्रण व प्रतिबधही फारसे होत नाही याउलट आपल्याला हमी भरून तुरुगापासून आपला बचाव केलाय अशी उपकाराची भावना सामनेवाल्यात निर्माण होते व तो या वर्गात अधिकाधिक आकर्षित होतो.धदेवाईक गुन्हेगार याचा फायदा घेऊन सामनेवाल्यास अधिक गुन्हे करावयास प्रवृत्त करतात जातीय तटा असेल तर जातीयवादी लोक हमी करून सामनेवाल्याचा उपयोग जातीय तणाव वाढविण्यासाठी करून घेतात गुन्हे करणारे व गुन्हापासून भय असणाऱ्या वर्गाचे हितसबध विरोधी असताना, जातीय तणावाचे परिस्थितीत या वर्गातील जामीन फक्त नुकसान भरपाईचे उद्देशाने घेणे योग्य आहे किंवा

सामनेवाल्यास तुरुंगापासून बचाव करण्यासाठी, ते जर खरोखरच त्याची सुधारणा व पुनर्वसन करणार असतील तर घ्यावयास हरकत नाही.

२) लोकप्रतिनिधी सार्वजनिक हिताबाबत दक्ष असावे अशी अपेक्षा आहे तत्त्वत. हमीदार लोक प्रतिनिधी असणे हितावह आहे. मात्र व्यवहारात अनेकदा लोकप्रतिनिधी गुडाचे दडपणास बळी पडतात हमीमुळे हाती आलेल्या सत्तेचा राजकीय स्पर्धेसाठी वापर होण्याचीही शक्यता असते सबब राजकीय पुढारी जर शुद्ध हेतूने प्रेरित असतील तरच त्याची हमी स्वीकारणे हितावह आहे.

३) उच्च हेतूने प्रेरित होऊन केसेसचा अभ्यास करू शकणा-या व सामाजिक हित व व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखणा-या, हमीच्या अटी तयार करण्यात व अमलबजावणीत मदत करू शकणा-या संस्थाचे पदाधिका-याची हमी घेणे फायद्याचे आहे.

**हमीदाराचे चारित्र : -**

गुन्ह्याचा प्रतिबध करण्याची हमीदारास तळमळ हवी व तसे करण्याची क्षमताही त्याच्याकडे असावयास हवी. धदेवाईक हमीदार, बेदरकारपणे अनेक लोकाना हमी पुरविणाऱ्या इसमाची हमी घेऊ नये ज्याना शिक्षा आहे, जे स्वत: गुन्हे करीत आहेत व ज्याचेबद्दल वहीम आहे अशाचे हमीपत्र घेऊ नये.

**हमीदारांची योग्यता : -**

१) कलम १२१ फौ.प्र स. प्रमाणे हमीदाराचे पात्रतेबद्दल स्वत: दंडाधिकारी अथवा त्याचे दुय्यम दंडाधिकारी यानी चौकशी करावयाची असते. ही चौकशी शपथेवर करावयाची असते, ही कायद्याने बंधनकारक आहे कनिष्ठ न्यायालय तसेच अपील चालविणाऱ्या वरिष्ठ न्यायालयावरही ती पूर्णपणे बंधनकारक आहे. अपील हाताळताना वरिष्ठ न्यायालय हमीपत्रात बदल करू शकते परतु विशिष्ट इसमाची हमी स्वीकारली पाहिजे, असा आदेश देऊ शकत नाही तसे करावयाचे असेल तर वरिष्ठ न्यायालयाने स्वत: हमीदाराबाबत चौकशी करणे आवश्यक आहे.

२) विशेष कार्यकारी दंडाधिकारी हमीदाराचे बाबत चौकशी करताना पोलीस अधिका-याचा मदत घेऊ शकतात. पण पात्रतेबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी पोलिसावर टाकू शकत नाही

३) चौकशीचे काम रेंगाळल्यास सामनेवाल्यास तुरुगात खितपत पडावे लागेल, सबब चौकशी त्वरेने करावयास हवी

४) चौकशीचे कामी हवी असलेला माहिती पुरविण्याचा आदेश कार्यकारी दंडाधिकारी सामनेवाल्यास, हमी देणाऱ्यास, तसेच वकिलाना देऊ शकतात. गुन्हाचा प्रतिबंध होण्यासाठी व अटींचे पालन होण्यासाठी ते काय व्यवस्था करणार आहेत ‘ ही विचारणा ते करू शकतात

**हमीच्या अटी:**

१) गुन्हयास प्रतिबंध हा मूळ हेतू असल्याने गुन्हा घडण्याच्या प्रक्रियेतील सर्व टक्कावर प्रतिबंध होईल अशी व्यवस्था असावी सबंधित इसम गुन्हा करणार नाही, गुन्हयांचा प्रयत्न करणार नाही, गुन्ह्याची तयारी करणार नाही, व गुन्हयांचे हेतूने हालचाल करणार नाही, अशी अट असली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंसा अथवा समाजास हानिकारक वा धोकादायक अपकुत्य, अपकुत्याचा प्रयत्न, तयारी वा त्या इराद्याने हालचाली होणार नाहीत असे बंधन असावयास हवे.
कोणती कुत्ये केली वा आढळली तर अशी तयारी वा गुन्हयांच्या इराद्याने हालचाली केल्या असे समजण्यात येईल, हे त्या त्या गुन्ह्याच्या अनुषगाने स्पष्टपणे ठरविले पाहिजे व तशा अटी लादल्या पाहिजेत गुन्हा होण्यास पोषक होणारी परिस्थिती उद्भवणार नाही अशा अटी असाव्यात.
२) आर्थिक हेतूने गुन्हा होत असेल तर अवैध मार्गाने चरितार्थ चालविणार नाही, अशी अट असावी वैध मार्गाने चरितार्थ चालू आहे याची खात्री कधी व कशी पटवून देणार याचा खुलासा असावा
३) अटीचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे, याबाबत तपशीलवार योजना असावी. सबंधितावर बारकाईने नजर राहील व चूक झाल्यास ताबडतोब गभीर परिणाम होतीलय अशी योजना करून ती अटीच्या रुपात बधनकारक करावयास हवी

**मुचलक्याच्या अटीचे उल्लंघन केल्यानंतरचा प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांचा अहवाल**

- - - - - - - - - - - - - येथील कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या कोर्टात.
चॅप्टर केस नबर : - - - - - - - - - - - - -
अर्जदार - - - - - - - - - - - - - -
विरोधक

अर्जदार खालीलप्रमाणे सादर करतो की,
वर नमूद चेपर केसमध्ये चांगले वर्तन ठेवण्यासाठी किंवा शांतता राखण्यासाठी दिनाक - - - - - - - - - - - - रोजी गैरअर्जदार आणि त्याच्या जामीनदारास मुचलका देण्यास सांगण्यात आला होता, त्यानुसार त्यांनी दिनाक - - - - - - - - - - - - रोजी मुचलका दिला. मुचलक्याचा कालावधी - - - - - - - - - - पासून ते - - - - - - - - - - पर्यंत होता.

या काळात पोलीस स्टेशनला पुढीलप्रमाणे दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे दाखल झाले असुन त्याचा अनुक्रमे प्रथम खबरी रिपोर्ट व अदखलपात्र गुन्हाच्या रजिस्टरमधील लॉग बुकचे उतारे सोबत जोडले आहेत. ज्यातून हे सिद्ध होते की, गैरअर्जदाराने मुचलक्यातील अटीचे उल्लंघन केले आहे म्हणून अशी विनती करण्यात येते की, गैरअर्जदाराविरुद्ध अटींचे उल्लंघन केल्याबाबतची कार्यवाही सुरू करून त्याचा आणि त्याचे जामीनदार यांचा मुचलका जप्त करून फौजदारी प्रक्रिया सहितेच्या कलम १२२(१) (ब) नुसार गैरअर्जदारास ताब्यात घेऊन मुचलक्यातील रकमेच्या वसुलीसाठी वॉरंट काढण्याचा आदेश घ्यावा.

दिनांक : - - - -

सही

पोलीस स्टेशन अधिकारी

## फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२२ ( १) (ब) आणि कलम ४४६ नुसार काढावयाच्या मुचलक्याच्या जप्तीचा आदेश

- - - - - येथील कार्यकारी दंडाधिकाऱ्यांच्या कोर्टात चॅप्टर केस नंबर
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - अर्जदार

विरुद्ध

- - - - - - - - - - - - - - - - गैरअर्जदार

अर्जदाराने असे सागितले की, गैरअर्जदार यास या कोर्टाकडून किंवा माझ्या पूर्वीच्या कोर्टाकडून - - - - - - - - - - - - - रोजी शांतता राखण्यासाठी किवा चांगल्या वर्तनाचा मुचलका देण्याचा आदेश देण्यात आला होता आणि गैरअर्जदाराने जामीनदारासहीत - - - - - - - -- - - रोजी दिलेला मुचलका स्वीकारण्यात आला होता. परंतु गैरअर्जदाराने मुचलक्यातील अटींचे उल्लंघन केल्यामुळे अर्जदाराने त्याचा मुचलका जप्त करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार गैरअर्जदारावर व त्याच्या जामीनदारास फॉर्म नंबर ९२ आणि ४४८ नुसार नोटिस पाठविण्यात आली.

गैरअर्जदार आणि जामीनदार माझ्यासमोर उपस्थित राहिले आणि ते गैरअर्जदाराने मुचलक्यातील अटीचे उल्लंघन केल्याचे नाकारतात.

अर्जदारानी माझ्यासमोर गैरअर्जदाराविरुद्ध दाखल झालेल्या गुन्हाच्या प्रथम खबरी रिपोर्टच्या प्रती सादर केल्या आहेत. किंवा गैरअर्जदारास शिक्षा झालेल्या गुन्हाच्या निकालपत्राच्या प्रती सादर केल्या आहेत. अर्जदारानी सादर केलेल्या साक्षीदाराच्या जबाबी नोंदविल्या असून त्यात गैरअर्जदाराने पुढील कृत्ये केली असल्याचे सदर साक्षीदारानी म्हटले आहे.

(त्यात गैरअर्जदाराने मुचलक्यातील अटींचे उल्लघन केले आहे अशा घटना,कृत्ये,गुन्हे नमूद करावे माझ्या समोर आलेला पुरावा लक्षात घेता गैरअर्जदाराने मुचलक्यातील अटींचे उतुघन होईल अशी कुत्ये केली असल्याबाबतचे माझे समाधान झाले म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश :

गैरअर्जदाराने मुचलक्यातील अटीचे उल्लघन केले असता त्याचा मुचलका जप्त करण्यात येत आहे. गैरअर्जदारास अटक करण्यासाठीचे वॉरंट काढण्यात यावे.

(विहित फॉर्म मध्ये) नमूद केलेली रक्कम जप्त करण्यासाठी वॉरंट काढावे.

**फौ. प्र. सं. कलम १४४ अन्वये मनाई आदेश व कलम १४९ अन्यथे नोटिस**

**(नमुना)**

**अ) नमुना - फौ. प्र. सं. कलम १४४ अन्वये मनाई आदेश**

**क्र. कक्ष १० विशा/बैठका/सुरक्षा........../०९ नाशिकः दिनांकः २०/०७/ २००९**

ज्या अर्थी दिनाक २२/०७/२००९ रोजी नाशिक येथे होणा-या मंत्रिमडळ बैठकीचे वेळी विविध पक्ष, संघटनेचे पदाधिकारी - कार्यकर्ते निरनिराळया मागण्यांसदर्भात मोर्चे, निदर्शने, धरणे, उपोषणे इ. आदोलनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करून नाशिक शहरातील शासकीय विश्रामगृह, नाशिक या ठिकाणी एकत्र येण्याची शक्यता आहे आणि ते शासकीय विश्रामगृहाच्या जवळ कॉर्नर मिटिंग, धरणे, मोर्चे, निदर्शने, उपोषणे, इ सारखे आदोलनात्मक कार्यक्रम आयोजित करण्याची शक्यता आहे आणि ज्या अर्थी सदर परिसरात सार्वजनिक शातता व सुव्यवस्थेचा भग होण्याची शक्यता आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी............ .पोलीस आयुक्त, नाशिक शहर मला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ आणि अन्य सर्व प्राप्त अधिकारानुसार दिनाक २१/ ७/ २००९ चे ००. ०० वा. पासून ते दिनाक २२/ ७७/२००९ चे २४.०० वा पर्यंत शासकीय विश्रामगृहाच्या बाहेरील २०० मीटर परिसरात कोणत्याही पक्षाचे पदाधिकारी/ कार्यकर्ते यानी पाच किवा पाचापेक्षा जास्त सख्येत एकत्र जमून सभा, बैठका घेण्यास, मोर्चा, धरणे, उपोषण करण्यास प्रतिबध करीत आहे त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे अग्निशस्त्र किंवा घातक शस्त्र जवळ बाळगण्यास बंदी घालीत आहे.

कोणत्याही व्यक्तीने वरील आदेशाचे उल्लंघन केल्यास त्याचेविरुद्ध भारतीय दंड सहिता कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश शासकीय कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचात किंवा शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच मा. मत्री महोदयाना भेटावयास येण्यासाठी सक्षम अधिका-यांनी परवानगी दिलेल्या शिष्टमडळाना लागू होणार नाही.

सदरचा आदेश माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनाक २०/०७ /२००९ रोजी नाशिक येथे जारी करण्यात आला.

पोलीस आयुक्त, नाशिक

प्रति

सर्व पो. स्टे. शाखा प्रभारी अधिकारी, नाशिक शहर

प्रत : -

१ मा. जिल्हाधिकारी, नाशिक

२. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय/ परिमंडळ, नाशिक शहर

३. सर्व सहा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर

४. सपादक, स्थानिक दैनिक वृत्तपत्र, नाशिक

## फ) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ अन्वये नोटिसीचा नमुना

जावक क्रमाक................. नोटिस! ०८ पोलीस ठाणे
नाशिक शहर
दिनाक ०२/०७/ २००८

### फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४९ अन्वये नोटिस

प्रती

श्री

पदाधिकारी,.................... संघटना

खात्रीशीररीत्या असे समजून आले आहे की, दि. ०३/ ०७/ २००८ रोजी आपण व आपल्या संघटनेमार्फत जणू काश्मिर येथील विवादित जमीन हस्तांतर प्रकरणावरून भारत बंद पुकारला आहे.

या नोटिसीद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, सन्माननीय मुंबई उच्च न्यायालय व सन्माननीय सर्वोच्च न्यायालय येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २८२७/ ०३ (मुंबई उच्च न्यायालय) यांच्या आदेशान्वये कोणत्याही प्रकारचा बंद पुकारणे बेकायदेशीर असून यापूर्वी सबधितांविरुद्ध न्यायालयाने दंडात्मक व इतर कारवाई ठोठावली आहे. त्यामुळे आपण पुकारलेला बंद पूर्णपणे बेकायदेशीर असून सन्माननीय न्यायालयाचे उल्लंघन आहे.

आपणास सूचित करण्यात येते कीं, आपण पुकारलेल्या बंद मुळे कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास किंवा जीवित, मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी फौजदारी व दिवाणी जबाबदारी आपणावर राहील व झालेल्या नुकसान भरपाईस पात्र राहील. तसेच सक्तीने बंद करण्यात आलेले व्यवसाय, उद्योग याची सुद्धा नुकसान भरपाई भरण्यास पात्र ठराल.

म्हणुन आपणास या नोटिसीव्दारे सुचित करण्यात येते की, आपण पुकारलेला बंद बेकायदशिर असल्याने मागे घेण्यात यावा आणि कुठल्याही परिस्थितीत सक्ती करण्यात येउ नये. आपले संघटनेच्या कार्यकर्त्यांनी यासंबधी केलेल्या कृत्यास संघटक म्हणुन आपली सुध्दा जबाबदारी राहील.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

---------------- पोलीस ठाणे
नाशिक शहर

# महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 अन्वये प्रतिबंधक कार्यवाही

## दोन.टोळयांची पांगापांग करणे व विवक्षित अपराधांबद्दल सिद्धापराध व्यक्तींना व विवक्षित भिका-यांना घालविणे

**कलम ५५. व्यक्तींच्या टोळया व जमाव यांची पांगापांग करणे.**- जेव्हा कलम (७) अन्वये बृहन्मुंबईसाठी व इतर क्षेत्रांसाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल तेव्हा बृहन्मुंबईत व अशा इतर क्षेत्रात आयुक्तास आणि त्याबाबत राज्य शासनाकडून अधिकार देण्यात आलेला जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी किंवा अधीक्षक यास जिल्ह्यात, व्यक्तींची कोणतीही टोळी अगर गट आपल्या प्रभारातील क्षेत्रात फिरत असल्यामुळे किंवा तळ देऊन राहिल्यामुळे तेथे धोका उत्पन्न झाला आहे किवा होण्याचा संभव आहे किंवा त्या टोळीचा किंवा जमावाचा किवा जमावातील व्यक्तींचा बेकायदेशीर रीतीने वागण्याचा हेतू असल्याबद्दल भीती किंवा वाजवी संशय उत्पन्न झाला आहे किवा होण्याचा संभव आहे असे दिसून येईल तेव्हा, त्या टोळीतील किंवा जमावातील व्यक्तिींनी हिंसा व भय यांस प्रतिबंध होण्यास जसे वागणे आवश्यक असेल तसे वागण्याबद्दल किंवा त्या टोळीची किंवा त्या जमावाची पांगापाग करून त्यातील प्रत्येक व्यक्तीने अशा अधिका-याच्या अधिकारितेतील स्थानिक हद्दीच्या क्षेत्राबाहेर किंवा त्याच्याशी लगतच्या असलेल्या अशा क्षेत्राबाहेर आणि कोणत्याही जिल्ह्याबाहेर किवा जिल्ह्यांबाहेर किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाहेर निघून जाण्याबद्दल किंवा तो विहित करील अशा वेळात जाण्याबद्दल व त्या प्रत्येकास ज्या क्षेत्राच्या किंवा जागेच्या बाहेर निघून जाण्याचा निदेश देण्यात आला असेल त्या क्षेत्रांत किंवा, यथास्थिति, त्यालगत असलेले कोणतेही क्षेत्र किंवा जिल्हा किंवा जिल्हे किंवा त्यांचा कोणताही भाग यात पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा त्या त्या जागेत पुन्हा न परतण्याबद्दल त्या टोळीचे किवा जमावाचे जे पुढारी किंवा प्रमुख म्हणून दिसत असतील त्यांच्या नावाने अधिसूचना काढून व ती अधिसूचना दवंडी पिटवून किंवा त्यास योग्य वाटेल त्या इतर रीतीने प्रसिद्ध करून आदेश देता येईल.

**कलम ५६. अपराध करण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तींना घालवून देणे.**- ( १) जेव्हा कलम ७ अन्वये बृहन्मुंबईसाठी व इतर क्षेत्रासाठी आयुक्त नेमलेला असेल तेव्हा बृहन्मुंबई व अशा इतर क्षेत्रात आयुक्तास आणि राज्य शासन, राजपत्रातील अधिसुचनेद्वारे या कलमाच्या तरतुदी ज्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांना लागू करीत अशा इतर क्षेत्रात किंवा क्षेत्रांत जिल्हा दंडाधिका-यास किंवा त्याबाबत राज्य शासनाने अधिकार दिलेल्या उप-विभागीय दंडाधिका-यासा जेव्हा असे आढळून येईल की, ...

(a) कोणत्याही व्यक्तीच्या हालचाली किंवा कृत्ये, ही व्यक्तीस किंवा मालमत्तेस भय, धोका किंवा इजा निर्माण करतील किंवा त्यापासून भय धोका किंवा इजा निर्माण होण्याचा संभव आहे, किंवा

(b) अशी व्यक्ती जबरीचा किंवा बळाचा उपयोग करण्याचा ज्यात अंतर्भाव होईल असा अपराध किंवभारतीय दंड संहितेतील प्रकरण बारा, सोळा किंवा सतरा या अन्वये शिक्षेस पात्र असा

अपराध करीत आहे किंवा करण्याच्या बेतात आहे किंवा कोणताही असा अपराध करण्यास अपप्रेरणा देत आहे, किंवा देण्याच्या बेतात आहे आणि अशा अधिका-याच्या मते आपल्या शरीराच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेस धोका पोचण्याच्या भीतीमुळे जाहिररीत्या अशा व्यक्तीविरुद्ध साक्ष देण्याकरिता पुढे येण्यास साक्षीदार तयार नाहीत, किंवा

(bb) ती व्यक्ती, (१) महाराष्ट्र जातीय, समाजविरोधी व इतर विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८० ( १९८१ चा महा. ७) यामध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यास बाधा येईल अशा कोणत्याही रीतीने, किंवा (२) काळया बाजारात प्रतिबंध आणि जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याची व्यवस्था अधिनियम, १९८० ( १९८० चा ७) चे कलम ३,पोट कलम ( १) च्या स्पष्टीकरणामध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे, समाजासाठी जीवनावश्यक असणा-या वस्तूंच्या पुरवठ्याच्या व्यवस्थेस बाध येईल अशा कोणत्याही रीतीने कृत्य करीत आहे किंवा तसे कृत्य करण्याच्या बेतात आहे असे मानण्यास वाजवी कारणे असतील, किंवा

(c) बाहेरून आलेली व्यक्ती सतत राहिल्याने साथीचा रोग उद्‌भवण्याचा संभव असेल तेव्हा उक्त आधिका-यास त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे तिच्यावर योग्य रीतीने लेखी आदेश बजावून किंवा दवंडी पिटवून किंवा इतर रीतीने, अशा व्यक्तीस किंवा बाहेरून आलेल्या व्यक्तीस, हिंसा व भय किंवा असे बाधक कृत्य यास प्रतिबंध व्हावा म्हणून किंवा अशा रोगांचा प्रादुर्भाव किंवा प्रसार होऊ नये म्हणून तिने जसे वागणे आवश्यक असेल तसे वागण्याबद्दल किंवा या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, उक्त आधिकारी विनिर्दिष्ट करील अशा, महाराष्ट्र राज्यातील एका किंवा अधिक क्षेत्रांमधून (मग ती क्षेत्रे त्या अधिका-याच्या स्थानिक अधिकारितेतील असोत किंवा नसोत आणि ती लगतची असोत किंवा नसोत) आणि अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या आत निघून जाण्याबद्दल निदेश देता येईल आणि त्याला जेथून निघून जाण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये (यात यापुढे ज्याचा निर्देश ''विनिर्दिष्ट क्षेत्र किंवा क्षेत्रे' असा केला आहे) पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा न परतण्याबद्दल निदेश देता येईल.

(२) पोट कलम ( १) अन्वये कोणत्याही व्यक्तीला राज्यातील कोणत्याही एका किंवा आधिक विनिर्दिष्ट क्षेत्रांमधून निघून जाण्याचा निदेश देणा-या अधिका-यास, अशा व्यक्तीला आणखी असास निदेश देता येईल की, तिच्याविरुद्धचा आदेश अमलात असेपर्यंत, जेव्हा ती राज्यातील इतर कोणत्याही क्षेत्रात राहील तेव्हा, तिने तिच्या पत्यामध्ये कोणताही बदल झालेला नसला तरी प्रत्येक महिन्यात एकदा सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यास आपले राहण्याचे ठिकाण कळविल. उक्त आधिका-यास असाही निदेश देता येईल की, अशा कालावधीत ती व्यक्ती राज्यातून बाहेर जाईल तेव्हा ती राज्याबाहेर गेल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आपल्या जाण्याचा दिनांक डाकेने किंवा अन्य प्रकारे, उक्त अधिका-याच्या लेखी कळविण्यात येईल आणि ती जेव्हा राज्यामध्ये परत आली असेल व येईल तेव्हा, तिने राज्यांत आल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या

आत ती जेथे राहत असेल त्या ठिकाणच्या सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-याला आपल्या येण्याचा दिनांक कळवील.

**कलम ५७. विवक्षित अपराधाबद्दल सिद्धअपराध व्यक्तींना घालवून देणे.**- ( १) जर एखाद्या व्यक्तीला,-

(a) (i) भारतीय दंड संहिता ( १८६० चा ४५.) यातील प्रकरण बारा, सोळा किंवा सतरा खालील अपराधाबद्दल सिद्धअपराध ठरविण्यात आले असेल किंवा

(ii) मुंबई दारूबंदी अधिनियम १९४९ ( १९४९ चा मुबई) याच्या कलम ६५, ६ ६-अ किवा ६८ या खालील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल किंवा

(iii) स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास आळा घालण्याबाबत अधिनियम, १९५६ ( १९५६ चा १०४) याच्या कलम ३, ४, ५, ६ किंवा ९ याखालील अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल; किंवा

(iv) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ( १९६२ चा ५२.) याच्या कलम १३५ खालील अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल; किंवा

(v) मुंबईचा जुगार खेळण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १८८७, ( १९८७ चा मुंबई ४) याच्या कलम ४ खालील अपराधाबद्दल किंवा कलम १२ च्या खंड (a) अन्वये कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा रहदारीच्या मार्गात किंवा जेथे लोकांना प्रवेश असेल किंवा प्रवेश करण्याची परवानगी असेल अशा कोणत्याही ठिकाणी किंवा कोणत्याही रेसकोर्सवर पैज स्वीकारण्याबद्दल किंवा कलम १२ -अ अन्वये सिद्धापराध ठरविण्यात आले असेल; किंवा

(b) मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ ( १९४९ चा मुंबई २५.) याखालील असेल परंतु कलम ६५, ६६-A किंवा ६८ खालील नसेल अशा अपराधाबद्दल दोनदा किंवा अधिक वेळा सिद्धापराध ठरविण्यात आले असेल; किंवा

(b-a) रेल्वे मालमत्ता (बेकायदेशीररीत्या ताब्यात ठेवणे) अधिनियम, १९६६ ( १९६६ चा २९) याच्या कलम ३ किंवा ४ खालील अपराधाबद्दल दोन किंवा अधिक वेळा सिद्धापराध ठरविण्यात आले असेल; किंवा

(c) या अधिनियमाच्या कलम १२२ किंवा १२४ खालील अपराधाबद्दल तीन किंवा अधिक वेळा सिद्धापराध ठरविण्यात आले असेल. तर आयुक्तास, जिल्हा दंडाधिका-यास, किंवा याबाबतीत राज्य शासनाने अधिकार प्रदान केलेल्या उप-विभागीय दंडाधिका-यास, अशा व्यक्तीला ज्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले होते त्या अपराधासारखा अपराध ती पुन्हा करण्याचा संभव आहे असे सकारण वाटत असले तर त्यास या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी उक्त अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा, महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रातून किवा क्षेत्रांमधून (मग ती क्षेत्रे त्या अधिका-याच्या स्थानिकअधिकारितेतील असोत किंवा नसोत आणि ती लगतची असोत किंवा नसोत) आणि अशा मार्गाने आणि अशा वेळेच्या

आत, निघून जाण्याबद्दल निदेश देता येईल आणि त्याला जेथून निघून जाण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''विनिर्दिष्ट क्षेत्र किवा क्षेत्रे'' असा केला आहे.) पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल किंवा न परतण्याबद्दल त्याला निदेश देता येईल.

( २) पोट-कलम ( १) अन्वये कोणत्याही राज्यातील कोणत्याही एका किंवा अधिक विनिर्दिष्ट क्षेत्रांमधून निघून जाण्याचा निदेश देणा-या अधिका-यास, अशा व्यक्तीला आणखी असा निदेश देता येईल की, तिच्या विरुद्धचा आदेश अमलात असेतोपर्यंत,जेव्हा ती राज्यातील इतर कोणत्याही क्षेत्रात राहील तेव्हा, ती, तिच्या पत्यामध्ये कोणताही बदल झालेला नसला तरी सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यास दर महिन्यात एकदा आपले राहण्याचे ठिकाण कळविल. उक्त अधिका-यास असा देखील निदेश देता येईल की, अशा कालवधीत, ती व्यक्ती राज्यातून बाहेर जाईल तेव्हा राज्याबाहेर गेल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत आपल्या जाण्याची दिनांक डाकेने किंवा अन्यप्रकारे उक्त अधिका-याला लेखी कळवील आणि ती जेव्हा राज्यामध्ये परत आली असेल व येईल तेव्हा, राज्यात आल्याच्या दिनांकापासून दहा दिवसाच्या आत, ती जिथे राहात असेल त्या ठिकाणच्या सर्वात जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-याला आपल्या येण्याचा दिनांक कळवील.

**स्पष्टीकरण -** या कलमाच्या प्रयोजनाकरिता ''एखाद्या व्यक्तीस ज्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले होते त्या अपराधासारखा अपराध' याचा अर्थ, --

(i) खंड ( a) (i) मध्ये नमूद केलेल्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, भारतीय दंड संहितेच्या ( १८६० चा ४५ .) कोणत्याही प्रकरणाखाली येणारा अपराध, असा आहे, आणि (ii) खंड (a) (त्याच्या उप-खंड (i)व्यतिरिक्त ), (b) आणि (c) मध्ये नमूद केलेल्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, उक्त खंडांमध्ये अनुक्रमे नमूद केलेल्या अधिनियमांच्या तरतुदींखाली येणारा अपराध असा आहे.

**कलम ५७ -A. भिकारी म्हणून घोषित केलेल्या विवक्षित व्यक्तींना घालवून देणे.** - मुंबईच्या भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९ ( १९६० चा मुंबई १०) जेथे अमलात असेल अशा कोणत्याही क्षेत्रामध्ये त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेला आयुक्त किंवा जिल्हा दंडाधिकारी त्या अधिनियमाचे कलम, ५ पोट-कलम (५) खंड (b) अन्वये न्यायालयाने काढलेल्या आदेशाची प्रत मिळाल्यानंतर, ज्या व्यक्तीस त्याच्यासमोर हजर राहण्याबाबतचे निदेश देण्यात आले आहेत अशा व्यक्तींची तपासणी करील आणि जर अशी व्यक्ती उक्त क्षेत्रामध्ये कोणत्याही कायदेशीर व्यवसायात, व्यापारात, आजीविकेत किंवा नोकरीत स्वत:ला गुंतवून घेण्याची शक्यता नाही याबाबत आयुक्ताची किंवा जिल्हा दंडाधिका-याची खात्री झाली तर अशा अधिका-यास अशा व्यक्तीवर योग्य रीतीने बजावलेल्या लेखी आदेशाद्वारे अशा व्यक्तीला उक्त अधिनियम जेथे अमलात आहे अशा क्षेत्रामधून किंवा क्षेत्रामधून आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आला असेल अशा कालावधीत स्वत: बाहेर निघून जाण्याबद्दल आणि जेथून तिला स्वत: बाहेर निघून जाण्याबाबतचे निदेश दिले असतील त्या क्षेत्रामध्ये, किंवा यथस्थिति, क्षेत्रामध्ये प्रवेश न करण्याचे किंवा न परतण्याचे निदेश देता येतील:

परंतु असा आदेश कोणत्याही व्यक्तीवर बजावण्यापूर्वी आयुक्ताने किंवा यथास्थिति, जिल्हादंडाधिका-याने, राज्य शासनाशी विचारविनिमय करून किंवा राज्य शासनाने या प्रयोजनासाठी काढलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार, त्याबाबतीत त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर कोणत्याही उपक्रमात सरकारी बांधकामावर किंवा अन्यथा, नोकरी स्वीकारण्याचा विकल्प अशा व्यक्तीस देऊ करील. असा विकल्प स्वीकारण्यात आला असेल त्याबाबतीत अशा स्वीकृतीची हद्दपारीच्या ओदशात नोंद करण्यात येईल:

परंतु आणखी असे की, अशी व्यक्ती कोणत्याही कामास अयोग्य आहे अशी आयुक्ताची किंवा जिल्हा दंडाधिका-याची  खात्री झाली असेल त्या बाबतीत तो, अशा व्यक्तीचे प्रकरण, त्या व्यक्तीस, मुंबईचा भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९५९ ( १९६० चा मुंबई १०) याच्या कलम ५, पोट-कलम (५) च्या खंड (c) मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे एखाद्या प्रमाणित संस्थेमध्ये अटकावून ठेवण्याचा आदेश न्यायालयाने द्यावा या विनंतीसह, न्यायालयाकडे निर्देशित करील.

**कलम ५८.:- कलमे ५५, ५६, ५७ व ५७ -A याअन्वये दिलेले आदेश अमलात असण्याची मुदत.**- कोणत्याही विशिष्ट क्षेत्रात किंवा, यथास्थिति, त्यालगत असलेल्या अशा क्षेत्रात किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये किंवा कोणताही जिल्हा किंवा जिल्हे यांत किंवा त्याच्या कोणत्याही भागात प्रवेश न करण्याबद्दल कलम ५५, ५६, ५७ किंवा ५७- A याअन्वये दिलेला निदेश, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीपुरता असेल आणि कोणत्याही बाबतीत अशी मुदत ती व्यक्ती ज्या दिनांकास त्या क्षेत्रामधून, त्या जिल्ह्यातून किंवा जिल्हयातून किंवा उपरोक्त भागातून, किंवा, यथास्थिति, विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रामधून स्वत: निघून गेली असेल किंवा तिला घालविण्यात आले असेल त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या मुदतीपेक्षा अधिक असणार नाही.

**कलम ५९. :- कलमे ५५, ५६, ५७ किंवा ५७ -A याअन्वये आदेश देण्यापूर्वी आपली बाजू मांडण्याची संधी देणे.**- ५६,५७ किंवा ५७-A या अन्वये कोणत्याही व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यापूर्वी उक्त कलमांपैकी कोणत्याही कलमान्वये काम करणारा अधिकारी किंवा त्या अधिका-याने प्राधिकार दिलेल्या निरीक्षकापेक्षा वरच्या दर्जाचा कोणताही अधिकारी तिच्याविरुद्ध करण्यात आलेल्या महत्त्वाच्या तक्रारीची सर्वसाधारण माहिती त्या व्यक्तीस लेखी कळवील व त्याविषयी स्पष्टीकरण करण्याची वाजवी संधी तिला देईल. जर अशी व्यक्ती तिने हजर केलेल्या कोणत्याही साक्षीदाराची तपसणी करण्याविषयी अर्ज करील तर संबंधित प्राधिकारी किंवा अधिकारी कारणे लेखी नमूद करून, असा अर्ज त्रास देण्याच्या किंवा विलंब लावण्याच्या कारणासाठी केलेले आहे असे त्याचे मत असेल त्याव्यतिरिक्त, असा अर्ज मंजूर करील व अशा साक्षीदाराची तपासणी करील. अशा व्यक्तीने सादर केलेले कोणतेही लेखी निवेदन त्या प्रकरणाच्या कागदपत्राना जोडील. अशा व्यक्तीस आपले स्पष्टीकरण देण्यासाठी किंवा तिने हजर केलेल्या साक्षीदारांची तपासणी करविण्यासाठी, अधिवक्त्यामार्फत किंवा न्याय प्रतिनिधीमार्फत या कलमान्वये काम चालविणा-या अधिका-यासमोर हजर राहण्याचा हक्क राहील.

(२) पोट-कलम ( १) अन्वये काम चालविणा-या प्राधिका-यास किंवा अधिका-यास जिच्याविरुद्ध कलम ५५, ५६,५७ किंवा ५७- A अन्वये कोणताही आदेश काढण्याचे योजिले असेल

अशी कोणतीही व्यक्ती  हजर राहील अशी व्यवस्था करण्यासाठी अशा व्यक्तीस हजर राहण्यास व चौकशीच्या वेळी जामीनदारांसह किंवा जामीनदारांवाचून प्रतिभूति बंधपत्र करून देण्यास भाग पाडता येईल. जर ती व्यक्ती असे प्रतिभूति बंधपत्र करून देण्यास कसूर करील किंवा चौकशीच्या वेळी अधिका-यासमोर किंवा प्राधिका-यासमोर हजर राहण्यात कसूर करील तर, त्या अधिका-याने  किंवा प्राधिका-याने चौकशीचे काम पुढे चालविणे हे कायदेशीर असेल आणि त्यानंतर त्याच्याविरुद्ध जो आदेश देण्याचे योजिले होते तो आदेश देता येईल.

**कलम ६० :- अपील.-** ( १) कलम ५५. ५६, ५७ किंवा ५७- A याअन्यये आदेश दिल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही अपील व्यक्तीस, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे   किंवा राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिका-याकडे (यात यापुढे ज्याचा निर्देश  ''विनिर्दिष्ट अधिकारी'' असा करण्यात आला आहे) अपील करता येईल.

(२) या कलमान्वये करावयाच्या अपिलाच्या दोन दुबार प्रती, ज्ञापनाच्या स्वरूपात दाखल करण्यात येतील व त्यात ज्या आदेशावर अपील करण्यात येत असेल त्या आदेशास ज्या मुद्यांवर हरकत घेण्यात आली असेल ते मुद्दे थोडक्यात दिले असतील व त्यासोबत तो आदेश किंवा त्याची प्रमाणित प्रत असेल.

(३) असे अपील मिळाल्यावर, राज्य शासनाला किंवा विनिर्दिष्ट  अधिका-याला अपील करणा-या व्यक्तीस आपले म्हणणे जातीने किंवा वकील, अधिवक्ता  किंवा न्यायप्रतिनिधी यांच्यामार्फत मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणताही चौकशी करावयाची असल्यास ती केल्यानंतर ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल तो आदेश कायम करता येईल .त्यात बदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल, किंवा ठरविता येईल किंवा राज्य शासनाला किंवा अधिका-याला  योग्य वाटेल अशा निदेशांसह ते प्रकरण निकालात काढण्यासाठी परत पाठविता येईल आणि त्याप्रमाणे स्वत **:** चा आदेश देता येईल:

परंतु राज्य शासन किंवा विनिर्दिष्ट अधिकारी इतर रीतीने निदेश देईल त्याव्यतिरिक्त, अपील निकालात काढण्यात येईपर्यंत ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश अमलात राहील.

**स्पष्टीकरण.-** या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल त्यात बदल करण्याच्या अधिकारामध्ये, तो आदेश आस्थगित ठेवण्याच्या अधिकाराचा आणि त्या व्यक्तीला ज्या क्षेत्रातून किंवा अशा क्षेत्रातून अथवा त्यालगतच्या कोणत्याही जिल्हयातून किंवा त्याच्या भागातून, अथवा यथास्थिति, विनिर्दिष्ट  क्षेत्रातून किवा क्षेत्रांमधून बाहेर जाण्याचे निदेश दिले असतील अशा ठिकाणी प्रवेश करण्याची किवा त्यामधून बाहेर जाण्याची परवानगी देण्याचा सशर्त आदेश काढण्याच्या अधिकाराचा समावेश असेल व तो नेहमीच असल्याचे  मानण्यात येईल.

(४) या कलमाखाली अपिलासाठी तरतूद केलेली तीस दिवसांची मुदत मोजताना ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रमाणित प्रत देण्यात लागलेली मुदत वगळण्यात येईल.

**कलम ६१. :- विवक्षित बाबतीत राज्य शासनाने दिलेल्या आदेशाची अंतिमता.-** कलम ५५, ५६, ५७ किंवा    ५७- A  याअन्यये काढलेल्या किंवा राज्य शासनाने कलम ६० अन्वये दिलेल्या

कोणत्याही आदेशांस, तो आदेश देणा-या प्राधिका-याने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने कलम ५९, पोट-कलम ( १) मध्ये उल्लेखलेली कार्यरीती अनुसरली नव्हती किंवा ज्याच्या आधारे त्याला आदेश देता आला असता अशी सामग्री संबंधित प्राधिका-यापुढे नव्हती, किंवा जिच्या संबंधात कलम ५६ अन्वये आदेश देण्यात आला होता त्या व्यक्तीविरुद्ध उघडपणे साक्ष देण्यासाठी पुढे येण्यास साक्षीदार तयार नव्हते असे उक्त प्राधिका-याचे मत नव्हते ही कारणे वगळता कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही

**६२. एखादी व्यक्ती क्षेत्र सोडून निघून न गेल्यास आणि घालविल्यानंतर तिने प्रवेश केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.**- (१) कलम ५५, ५६, ५७ किंवा ५७- A अन्वये स्वात: कोणतेही क्षेत्र, जिल्हा किंवा त्याचा भाग किंवा कोणतेही विनिर्दिष्ट क्षेत्र सोडून जाण्याबद्दल जिला आदेश देण्यात आला असेल अशी व्यक्ती,-

(i) निदेश दिल्याप्रमाणे स्वत: निघून जाण्यात कसूर करील

किंवा

(ii) अशा रीतीने स्वत: निघून गेल्यानंतर पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आदेश देणा-या प्राधिका-याच्या लेखी परवानगीखेरीज आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत उक्त क्षेत्रात, जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रात प्रवेश करील तर



संबंधित प्राधिका-यास तिला अटक करविता येईल व प्रत्येक बाबतीत उक्त प्राधिकारी विहित करील अशा, उक्त क्षेत्र, जिल्हा किंवा यथस्थिति, त्याचा भाग किंवा विनिर्दिष्ट याबाहेरील जागी पोलिसांच्या अभिरक्षेत नेऊन ठेवता येईल.

(२) कलम ५५, ५६, ५७ किंवा ५७-A अन्वये आदेश देणा-या प्राधिका-यास ज्या व्यक्तीबाबत अशा रीतीने आदेश देण्यात आला असेल त्या व्यक्तीस ज्या क्षेत्रातून किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून त्या लगत असलेले जिल्हे व भाग धरून-निघून जाण्याबाबत निदेश देण्यात आला होता त्या क्षेत्रात व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात, अशा परवानगीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तात्पुरत्या मुदतीसाठी व विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची परवानगी देता येईल, तसेच त्यास, लादण्यात आलेल्या शर्तीचे योग्य रीतीने पालन करण्यासाठी जामीनदारासह किंवा जामीनदारावाचून बंधपत्र लिहून देण्यास अशा व्यक्तीस फर्मावता येईल. उपरोक्त अधिका-यास कोणत्याही वेळी अशी कोणतीही परवानगी रद्द करता येईल. अशी परवानगी घेऊन त्या क्षेत्रात, जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा अशा विनिर्दिष्ट क्षेत्रात प्रवेश करणा-या किंवा परत येणा-या कोणत्याही व्यक्तीने लादलेल्या शर्तीचे पालन करावे आणि ज्या तात्पुरत्या मुदतीसाठी तिला प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची परवानगी देण्यात आली असेल ती मुदत संपल्यावर किंवा अशी परवानगी त्यापूर्वीच रद्द करण्यात आली असेल तर तिने त्या क्षेत्रातून किंवा असे क्षेत्र आणि त्यालगत असलेले कोणतेही जिल्हे किंवा त्यांचा भाग यातून किंवा अशा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा

क्षेत्रांतून स्वत : होऊन निघून जावे, आणि कलम ५५, ५६,५७ किंवा ५७-A अन्वये दिलेल्या आदेशात जी मुदत विनिर्दिष्ट करण्यात आली असेल त्या मुदतीपैकी उरलेल्या मुदतीत, ती त्या पुन्हा परवानगी घेतल्याशिवाय प्रवेश करणार नाही किंवा परत येणार नाही. जी कोणतीही व्यक्ती लादलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात किंवा त्यानुसार स्वत: होऊन निघून जाण्यात कसूर करील किंवा अशा रीतीने स्वात: होऊन निघून गेल्यावर, पुन्हा परवानगी घेतल्याशिवाय त्या क्षेत्रात किंवा ते क्षेत्र आणि त्यालगत असलेले कोणतेही जिल्हे किंवा त्यांचे भाग यात किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये प्रवेश करील किंवा परत येईल तर संबधित प्राधिका-यास त्या व्यक्तीस अटक करविता येईल व प्रत्येक बाबतीत संबंधित प्राधिकारी, विहित करील अशा क्षेत्राबाहेरील व जिल्ह्याबाहेरील किंवा त्याच्या भागाबाहेरील किंवा यथास्थिात, विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेरील किंवा क्षेत्रांबाहेरील ठिकाणी पोलीस अभिरक्षेत नेऊन ठेवता येईल.

**६३. ज्या क्षेत्रातून एखाद्या व्यक्तीस स्वत:हून निघून जाण्याचा निदेश देण्यात आला असेल, त्या क्षेत्रात प्रवेश करण्याची किंवा त्या क्षेत्रात परत येण्याची तात्पुरती परवानगी.** - ( १) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने त्याबाबत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास आदेश देऊन, जिच्या संबंधात कलम ५५,५६, ५७ किंवा ५७-A अन्वये आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, यथास्थिती ज्या क्षेत्रातून किंवा क्षेत्रातून व त्यास जोडून असलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रामधून निघून जाण्याचा निदेश दिला असेल त्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्रामध्ये व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रात किंवा क्षेत्रामध्ये किंवा तो सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा व अशी व्यक्ती मान्य करील अशा शर्तीस अधीन राहून तात्पुरत्या मुदतीकरिता प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची परवानगी देता येईल आणि राज्य शासनास, किंवा यासंबंधात राज्य शासनाने विशेषरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास अशी कोणतीही परवानगी कोणत्याही वेळी रद्द करता येईल.
(२) ज्या क्षेत्रातून किंवा क्षेत्रातून व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून किंवा त्याच्या भागातून किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रामधून निघून जाण्याबद्दल एखाद्या व्यक्तीस निदेश देण्यात आला असेल, यथास्थिति, त्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्रामध्ये व त्यास जोडून असलेल्या कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा



विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रामध्ये प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची पोट-कलम ( १) अन्वये परवानगी देताना राज्य शासनास किंवा अशा अधिका-यास लादलेल्या शर्ती पालन करण्यासाठी जामीनदारासह किंवा जामीनदारवाचून बंधपत्र करून देण्यास अशा व्यक्तीस फर्मावता येईल.

(३) यथास्थिती ज्या क्षेत्रातून किंवा क्षेत्रांतून व त्यालगत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यातून किवा त्याच्या भागातून किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रांमधून निघून जाण्याचा निदेश देण्यात आला होता, यथास्थिति, त्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्रामध्ये व त्यालगत असलेल्या कोणत्याही

जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात किंवा विनिर्दिष्ट क्षेत्रातून किंवा क्षेत्रामध्ये प्रवेश करण्याची किंवा परत येण्याची पोट-कलम ( १) अन्वये परवानगी मिळालेली कोणतीही व्यक्ती, यथास्थिति उक्त आदेशात किंवा उक्त आदेश रद्द करणा-या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वेळी व ठिकाणी व त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिका-याच्या स्वत:हून स्वाधीन होईल.

**६३ -AA. राज्य शासनाचे व विशेष रीत्या अधिकार दिलेल्या अधिका-याचे तडीपार करण्याविषयीचे अधिकार.-** ( १) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने त्याबाबत विशेषरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिका-यास कलम ५५, ५६, ५७, व ५७ अ याअन्यये ज्या क्षेत्रासाठी आयुक्ताची नेमणूक करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात आयुक्ताने व एखाद्या जिल्ह्यात त्याबाबत राज्य शासनाकडून अधिकार दिलेला जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी किंवा यथास्थिति, अधीक्षक याने वापरावयाच्या अधिकारांचा, त्यात राज्य शासनाने किंवा विशेष रीत्या अधिकार दिलेल्या अधिका-याने यथास्थिति, टोळीतील किंवा जमावतील व्यक्तीला किंवा व्यक्तींना किंवा भिकारी म्हणून घोषित करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणतेही स्थानिक क्षेत्र किंवा असे कोणतेही क्षेत्र किंवा कोणतेही जिल्हे किंवा त्यांचा भाग- मग तो त्यालगत असो अगर नसो- सोडून जाण्याबद्दल आणि त्यात पुन्हा प्रवेश न करण्याबद्दल अथवा न परतण्याबद्दल कलमे ५५ व ५७-A अन्वये निदेश देणे कायदेशीर असेल, असा फेरफार करून त्याच परिस्थितीत व त्याच रीतीने वापर करता येईल.

(२) कलम ५८, ५९, ६०, ६१,६२ आणि ६३ यांच्या तरतुदी, त्यात योग्य फेरफार करून ज्याप्रमाणे त्या कलम ५५, ५६, ५७ किंवा ५७-A या अन्वयेच्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास लागू होतात त्याप्रमाणे या कलमाखालील कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास लागू होतील.

**कलम ५५,५६, ५७,५ यांचे संबंधात शिक्षेची तरतूद: -**

**कलम १४१ :** - जो कोणी कलम ५५, ५६, ५७,५७ (अ) किंवा (६३) अ अन्वये दिलेल्या कोणत्याही निर्देशास विरोध करील किंवा त्याचे पालन करणार नाही किंवा त्यानुसार वागण्यात करू करील किंवा त्याकरिता अपप्रेरणा देईल, त्या व्यक्तीस अपराध सिद्धीनतर- १ वर्षापर्यंत असू शकेल अशी शिक्षा कैद, जी लेखी नमूद करावयाच्या कारणाखेरीज, ४ महिन्यापेक्षा कमी असणार नाही तसेच दंडही होईल

**कलम १४२ -** अ) जी कोणतीही व्यक्ती, हद्दपार आदेशात ५५, ५६, ५७, ५७-०, ६३ मध्ये दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन करून मनाई केलेल्या भागात, परवानगीशिवाय प्रवेश करील अथवा परत येईल.
व) परवानगीने परत आल्यानंतर परवानगीची मुदत संपली अथवा ती रद्द करण्यात आली तरी जाणार नाही, किंवा जाऊन परवानगीशिवाय प्रवेश करील, त्या व्यक्तीस अपराध सिद्धीनंतर
**शिक्षा :** लेखी नमूद करावयाच्या कारणाखेरीज कैद ६ महिन्यापेक्षा कमी असता कामा नये जास्तीत? जास्त २ वर्षापेक्षा जास्त नसावी/ व दंड.

**कलम- १४९ : कलम ७० अन्वये दिलेल्या निर्देशास विरोध केल्याबाबत किंवा पालन न केल्याबाबत शिक्षा** -जी कोणतीही व्यक्ती कलम ७० प्रमाणे दंडाधिका-याने दिलेल्या किंवा पो. अ. ने दिलेल्या कोणत्याही वाजवी निर्देशास विरोध करील किंवा त्याचे पालन करणार नाही किंवा जो कोणी निर्देशास विरोध करणेस मदत करील किंवा पालन न करण्यास मदत करील.
**त्यास अपराध सिद्धीनंतर शिक्षा :**
जास्तीत जास्त १ वर्ष मुदत कैद आणि दड व कमीत कमी ४ महिने कैद आणि दड परतु कमीत कमी शिक्षेपेक्षाही कमी शिक्षा जर जिस्ट्रेटला द्यावयाची असेल तरय त्याने लेखी व पुरेशी कारणे त्याचे निकालपत्रात नमूद करावयास हवीत

**कलम ७० :** जो कोणी कलम ३७,३८,३९ या कलमानुसार निर्देश दिलेला असताना आदेशाविरुद्ध वागणाऱ्यांना परावृत्त करणे, परंतु त्या व्यक्तीने नाकारल्यास त्याचा भंग करील तर.
ह्या कलम ७० नुसार तो गुन्हा दखलपात्र असेल व अशा व्यक्तीस वारटशिवाय अटक करता येईल व वस्तूही जप्त करता येतील.

**कलम १६३ : - जाहीर नोटिस प्रसिद्ध करणे -**

या कायद्याखालील कोणत्याही उपबधानुसार नोटिस देणे आवश्यक असेल तर ती खालील पद्धतीने जाहीर करावी.
१) ती लेखी असून तिच्यावर अधिकाऱ्याची सही असणे आवश्यक आहे.
२) ती ज्या स्थानाकरिता लागू होईल त्या स्थानामध्ये ती ठळकरीत्या लोकाना दिसेल अशा सार्वजनिक ठिकाणी लावली पाहिजे तिच्या प्रती चिटकवल्या पाहिजे.

३) त्या भागात दवंडी दिली पाहिजे किंवा घोषणा द्यावयास हवी.
४) इंग्रजी, हिंदी किंवा प्रादेशिक भाषेतील स्थानिक वर्तमानपत्रात तिची जाहिरात दिली पाहिजे.
५) महाराष्ट्र शासनाने राजपत्रात प्रसिद्ध करावी
६) व्यक्तिगत हुकूम अगर नोटिस असेल तर एक प्रत सबंधित इसमास द्यावी.
या वरील साधनापैकी दोन किंवा दोन पेक्षा जास्त साधनानी किंवा त्यात योग्य वाटेल त्या साधनांनी प्रसिद्ध करण्यात यावी.

## अ. हद्दपार प्रस्ताव - कागदपत्रांची पूर्तता

- जमाव अगर गट अगर टोळी हद्दीत राहात असल्याबद्दल लेखी/तोंडी पुरावा.

- त्या टोळीने भय, धोका निर्माण केला आहे याबद्दल लेखी / तोंडी पुरावा.
- टोळी, गट, जमाव बेकायदेशीर वागला अगर वागणार आहे, याबद्दल तोंडी पुरावा म्हणजेच जबाब
- दाखल झालेल्या हिंसक दरोडा, जबरी चोरी इ. गुन्हाच्या खबरीच्या नकला.
- गुन्हाचे ठिकाणाचे पंचनाम/नकला.
- नियोजित हद्दपार इसमास गुन्हाचे वेळी हजर असल्याने ओळखल्याबद्दल व भय किंवा हिंसा केले बद्दल साक्षीदाराचे जबाबाच्या नकला.
- नियोजित हद्दपार इसमास साक्षीदारानी ओळखले त्या ओळख परेडचे पंचनाम्याची नक्कल
- नियोजित हद्दपार इसमाकडून चोरीचा माल जप्त केला त्या संबधी जप्तीचे पंचनामा नक्कल. . नियोजित हद्दपार इसमास असलेले गुन्ह्यातील मेडिकल सर्टिफिकेटसू.
- नियोजित हद्दपार विरुद्ध खटला पाठवल्याबद्दल चार्जशीटची नक्कल व खटला न्यायसन्मुख आहे असे कोर्टाचे सर्टिफिकेट
- फिर्यादीचे गुन्हा प्रस्तावाचे वेळी घेतलेले जबाब.
- नियोजित हद्दपार इसमावर पूर्वी योजलेली प्रतिबंधक कारवाईचे अहवालाची नक्कल, निकालाची नक्कल, बॉण्ड दिला असल्यास त्याची नक्कल.
- हिंसक गुन्हात शिक्षा झाली असेल तर शिक्षेचे दाखले.
- नियोजित हद्दपार हा जामिनावर मोकळा असल्यासबंधी कोर्टाचा दाखला.
- नियोजित हद्दपार इसमाविरुद्ध जिल्ह्यात व इतरत्र दाखल असलेले दरोडा व जबरी चोरीच्या गुन्हाचा क्राईम रजिस्टरच्या उतारा.
- वरील सर्व कागदपत्र कालानुक्रमे लावावीत व त्यानंतर अधिकार क्षेत्राचे हद्दपार करणारे अधिका-यास कागदपत्रे अनुषगाने अहवाल हद्दपार करण्यासाठी पाठवावा.
- नियोजित हद्दपार यास पूर्वी शिक्षा असलेले त्याचे दाखले.
- नियोजित हद्दपार याची चेहरेपट्टीची नक्कल.